N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** सुरगणा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0068 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/03/2025 05:27

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 25/03/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/03/2025
   **Time From (वेळेपासून):** 19:01 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 04:57 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 26/03/2025 **Time (वेळ):** 04:57 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/03/2025 04:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 14 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सुरगाणा ते बोरगाव,बोरगाव, बोरगाव,सुरगाणा, 422211

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** सुरगणा

**District(State) (जिल्हा(राज्य)):** नाशिक ग्रामीण(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): कष्णा जगन्नाथ गायकवाड

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : जगन्नाथ गायकवाड

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गंगापुर रोड,रा दत्त चक चिंतामणी अपार्टमेंट,वणी ता दिंडोरी, दिंडोरी, दिंडोरी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गंगापुर रोड,रा दत्त चक चिंतामणी अपार्टमेंट,वणी ता दिंडोरी, दिंडोरी, दिंडोरी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9373926565

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेश गोकुळ पोतदार | | वडील का नाम : गोकुळ पोतदार | 1. विद्या हौसींग रो-हाउस नं 15,, राजमाता मंगल कार्यालयाजवळ, RTO,नाशिक ,म्हसरूळ पोलीस स्टेशन,नाशिक शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

तक्रारदार .यांनी तक्रार दिल्याने लागलीच दाखल

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2,10,000/ रूपये (त्यात 500 रू.दराच्या 40 चलनी नोटा व 500 रु. दराच्या 380 अचलनी नोटा) | 210,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

210,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

सुरगाणा पोलीस स्टेशन,
नाशिक ग्रामीण
दिनांक 26/03/2025

माझे नाव कृष्णा जगन्नाथ गायकवाड, वय - 44 वर्ष, व्यवसाय- व्यापार, कृष्णा ट्रेडींग कंपनी, वणी ता. दिंडोरी जि.नाशिक रा. दत्त चौक, चिंतामणी अपार्टमेंट, गंगापुर रोड, नाशिक मो.नं. 973926565

समक्ष पोलीस ठाण्यात हजर होवून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी आई ताराबाई, वडील जगन्नाथ, पत्नी सौ. सुरेखा, मुलगा अनिरुध्द, मुलगी विशुप्रिया यासह राहतो व माझे वणी ता. दिंडोरी जि.नाशिक या गावात कृष्णा ट्रेडींग कंपनी नावाचे शेती उपयोगी औषधे, खते बी बियाणे, सिमेंट स्टील विक्री करण्याचे दुकान असुन, सदरचे दुकान चालवुन कुंटुंबाचा उदरनिर्वाह भागवतो. माझे दुकाना मार्फत मी सुरगाणा तालुक्यातील शासकीय कामा करीता मटेरियल पुरवत असतो. मी पुरविलेले मटेरियलचे पैसे, मला शासकीय पध्दतीने मिळत असतात.

मी, एप्रिल 2024 मध्ये खोकरी, अंबोडे, मांदा, कोठुळे ता. सुरगाणा जि. नाशिक येथील ग्रामपंचायतीचे मागणीनुसार महात्मा गांधी राश्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत ग्रामपंचायत हद्दीत बंधारा बांधण्याकरीता माझे कृष्णा ट्रेडींग कंपनी वणी ता. दिंडोरी जि.नाशिक या दुकानातुन 2,32,30,027/- रुपयाचे सिमेंट व स्टील मटेरियल पुरविले होते. सदर मटेरियल दिल्यानंतर मी, तीन बिले असे एकुण 2,32,30,027/- रुपयाचे बिल गटविकास अधिकारी, सुरगाणा जि. नाशिक या कार्यालयात सुमारे चार महिन्यापुर्वी सादर केले होते. सदरचे बिल श्री. महेश गोकुळ पोतदार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सुरगाणा जि. नाशिक यांचे अधिपत्या खाली असल्याचे समजले. त्यावेळी मी गटविकास अधिकारी श्री. महेश गोकुळ पोतदार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सुरगाणा जि. नाशिक याना जावुन भेटलो असता, त्यांनी माझेकडे एकुण बिलाचे 2 टक्के प्रमाणे 4,64,600/- रुपयाची मागणी करुन, सुमारे 4,60,000/-रुपये रक्कमेची मागणी केली व सदरचे बिले जिल्हा परिशद, नाशिक या कार्यालयात मंजुरीसाठी पाठविणेकरीता 2,50,000/- रुपये मागितले. मी जर श्री. पोतदार साहेब यांना 2,50,000/- रुपये दिले नाही तर, ते माझे बिले जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक येथे मंजुरी करीता पाठविणार नाही, त्यामुळे मी लागलीच श्री. पोतदार यांना 2,50,000/- रुपये दिले. त्याची मला त्यांनी कोणत्याही प्रकारचे भरणा पावती मला दिली नाही. त्यानंतर श्री. पोतदार यांनी सदरचे बिले ई मेलव्दारे जिल्हा परिशद नाशिक येथील कार्यालयात पाठविले असल्याचे मला समजले. त्यानंतर मी, जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक येथे जावुन माझे बिला बाबत चौकशी केली असता, सदरचे बिले मंजुरीसाठी नागपुर कार्यालयात रवाना केल्याचे समजले. त्यानंतर श्री. पोतदार यांनी मला त्यांचे कार्यालयात वारंवार बोलावुन मी, तुझे एमबी वर सहया केलेल्या नाही. त्यामुळे तुला तुझे बिल मिळणार नाही, त्यासाठी मला, राहिलेले 2,10,000/- रुपये दयावे लागतील, तुम्हाला वाटत असेल की, तुमचे काम झाले पण तुमची मान अजुन माझे हातात आहे, आत्ता पैसे दिल्या शिवाय मी एमबी (मुल्यांकन नोंदवही) वर सही करणार नाही असे म्हणुन माझे बिलाचे मुल्यांकन नोंदवही वर सहया करण्याकरीता

माझेकडे पैशांची मागणी केली. त्यावेळी मी श्री. पोतदार साहेब यांना होकार देवुन नंतर येतो असे सांगुन तेथुन निघुन आलो. दिनांक 25/05/2025 रोजी माझे कामावरील सुपरवायझर श्री. मयुर आहिरराव यांनी मला फोन करुन कळविले की, श्री. पोतदार साहेब, सुरगाणा यांचा त्यांना फोन आला व त्यांनी मला भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयात बोलविले आहे बाबत सांगितले. सदर कामासाठी मी दि.25/03/2025 रोजी गटविकास अधिकारी कार्यालय, सुरगाणा जि. नाशिक येथे श्री. पोतदार साहेब, गटविकास अधिकारी यांना भेटायला जाणार होतो व मी जर श्री. पोतदार साहेब, गटविकास अधिकारी, सुरगाणा जि. नाशिक यांना त्यांचे मागणी प्रमाणे 2,10,000/- रुपये दिले नाही तर ते माझे 2,32,30,027/- रुपयाचे बिलाचे मुल्यांकन नोंदवहीवर सहया न करता, काहीतरी अडथळा करून विलंब करतील याची मला खात्री होती. श्री.पोतदार साहेब यांनी माझेकडुन यापुर्वी 2,50,000/- रुपये घेवुन मला कोणतीही भरणा पावती न देता, पुन्हा 2,10,000/- रुपये मागत असलेली रक्कम हि लाचेची रक्कम असल्याबाबत माझी खात्री झाली होती व मला श्री. पोतदार यांना कोणत्याही प्रकारची लाच देण्याची ईच्छा नव्हती.

मला श्री. पोतदार, गटविकास अधिकारी, सुरगाणा जि. नाशिक यांना ते माझेकडे मागत असलेली लाचेची रक्कम 2,10,000/- रूपये देण्याची ईच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात फोन करुन माहिती दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र सानप, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांनी वणी ता. दिंडोरी जि.नाशिक येथे माझी भेट घेतली, त्यावेळी मी त्यांना माझी श्री. पोतदार, गटविकास अधिकारी, सुरगाणा जि. नाशिक यांचे विरूध्दची सविस्तर तक्रार माझे हस्ताक्षरात लिहून दिली.

मी दिलेल्या तक्रारी प्रमाणे पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र सानप यांनी, श्री. पोतदार, गटविकास अधिकारी, सुरगाणा जि. नाशिक हे माझेकडे खरोखर खोकरी, अंबोडे, मांदा, कोठुळे ता. सुरगाणा जि. नाशिक येथील ग्रामपंचायतीस महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत ग्रामपंचायत हद्दीत बंधारा बांधण्याकरीता माझे कृष्णा ट्रेडींग कंपनी वणी ता. दिंडोरी जि.नाशिक या दुकानातुन 2,32,30,027/- रुपयाचे सिमेंट व स्टील मटेरियल बिलाचे एमबी (मुल्यांकन नोंदवही) वर सही करण्याकरीता एकुण बिलाचे 2 टक्के प्रमाणे 4,64,600/- रुपयाची मागणी करुन, सुमारे 4,60,000/-रुपये रक्कमेची मागणी केली व त्यातील 2,50,000/- रुपये घेवुन कोणतीही भरणा पावती न देता उर्वरीत 2,10,000/- रुपये लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणेसाठी माझेसोबत पंच श्री.राहुल घटी व षासकीय डीजीटल व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टच्या आंत मध्ये बनियानला लावुन मला, श्री.पोतदार, गटविकास अधिकारी, सुरगाणा जि.नाशिक यांचे भेटीकरीता गटविकास अधिकारी, सुरगाणा जि. नाशिक या कार्यालयात माझेकडील इन्होवा वाहन क्रमांक एमएच 15 एफएन 8160 या वाहनाने पंच श्री. राहुल घटी यांना चालक म्हणुन फुलावती पेट्रोलियम, चिराई ता.सुरगाणा जि. नाशिक याचे समोरुन सुरगाणा जाणारे रोडवरुन रवाना केले. त्यावेळी श्री.पोतदार, गटविकास अधिकारी, सुरगाणा जि.नाशिक यांची गटविकास अधिकारी कार्यालया मध्ये त्यांचे कक्षेत भेट झाली. त्यावेळी लोकसेवक श्री. पोतदार हे म्हणाले की, तुम्ही स्वभाव नाही बदलायला पाहिजे, तुम्ही पण मोकळं व्हायला पाहिजे असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना सांगा तुम्ही मला काही अडचण नाही असे म्हणाले असता, त्यावेळी त्यांनी मला माझे मोबाईलकडे हात करुन, घ्या तुमच्याकडे ते कॅल्क्युलेटर, मी य ना, पुर्ण फायनल होवस्तर पर्यंत, मी तुम्हाला सांगायला पण नाही आलो. ते त्यादिवशी योगा योगाने आपण गाडीत होतो म्हणे एवढं जावुदया आपण नंतर हिशोब करुया, पण तो दिवसच नाही उजाडला साहेब असे म्हणाले. त्यावेळी मी, त्यांना म्हणालो तुम्ही विचार करा ना एवढे दिवस झाले, काम करतो. एक रुपया भी भेटला नाही, तुम्ही स्वतः बघता, काही पेमेंट नाही त्यावेळी श्री. पोतदार म्हणाले की, नई मग आता हे चार- साठ हे ना, याच्यातुन तुमचे त्या दिवशीचे किती ते मायनस करुन टाका, झाले किती असे म्हणाले. त्यावेळी मी म्हणालो तीन होते ना, तीनच दिले होते करुन मग त्यावेळी श्री. पोतदार म्हणाले दोन पन्नास असे म्हणुन 2,50,000/- पुर्वी घेतल्याचे मान्य केले. मग मी म्हणालो बरं ठिकय मी बघुन घेतो काय असेल ते असेल दोन पन्नास हे आणि आता किती दोन लाख दहा हजार दयायचे ना तुम्हाला. त्यावेळी श्री. पोतदार म्हणाले ठिक हे असे म्हणुन 2,10,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केले. त्याबाबत आमची व पोलीस निरीक्षक श्री. सानप साहेब व पंच यांची खात्री झाली.

मला, पोलीस निरीक्षक श्री.सानप, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांनी, श्री.पोतदार, गटविकास अधिकारी, सुरगाणा जि.नाशिक यांना लाच म्हणुन देणेसाठी लागणारी रक्कम हजर करण्यास सांगीतली असता, मी माझेकडे उपलब्ध असलेले 20,000/- रुपये त्यात 500/-रू दराच्या 40 चलनी नोटा हजर केल्या व उर्वरीत 1,90,000/- रुपयाचे अचलनी नोटा(डमी नोटा) श्री. सानप यांनी सापळा पथकातील सदस्या मार्फत हजर केल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.सानप यांनी सापळा पथकातील सदस्या करवी अँन्थ्रासीन पावडर बाबत मला पंचासमक्ष प्रात्यक्षीक दाखवून त्या रक्कमेस अँन्थ्रासीन पावडर लावुन, त्या नोटा एका निळया रंगाचे कापडी पिशवीत ठेवुन, ती पिशवी माझेकडे देवुन, सदर लाचेच्या रक्कमेची पिशवी मी, माझे इन्होवा वाहन क्रमांक एमएच 15 एफएन

8160 या वाहनात ठेवली.

त्यानंतर पोनि श्री. राजेंद्र सानप यांनी मला, व दोन्ही पंच व सापळा पथकातील इतर सदस्य यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने सुचना दिल्या की, लोकसेवक श्री.पोतदार, गटविकास अधिकारी, सुरगाणा जि.नाशिक यांना लाचेची रक्कम दिल्यानंतर, तुमच्या चारचाकी वाहनाचे पार्किंग लाईट चालु करावी व गाडी थांबवावी असा इषारा करणे बाबत सर्वासमक्ष सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र सानप यांनी मला व पंच श्री. राहुल घटी यांना श्री.पोतदार, गटविकास अधिकारी, सुरगाणा जि.नाशिक यांचे भेटी करीता व्हाईस रेकॉर्डरमध्ये पंचासमक्ष नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझेकडील इन्होवा वाहन क्रमांक एमएच 15 एफएन 8160 या चारचाकी वाहनाने फुलावती पेट्रोलियम, चिराई ता.सुरगाणा जि. नाशिक याचे समोरुन सुरगाणा जाणारे रोडवरुन रवाना केले.

आमचे मागोमाग पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र सानप व सापळा पथकाने येवून सापळा आयोजीत केला. मी, श्री. राहुल घटी यांचेसह गटविकास अधिकारी कार्यालय, सुरगाणा जि. नाशिक येथे गेल्यानंतर लोकसेवक श्री.पोतदार, गटविकास अधिकारी हे त्यांचे कार्यालयातील कक्षात हजर होते. त्यावेळी श्री. पोतदार यांनी माझे इन्व्होवा गाडीत बसुन गाडी चालविण्यास सांगितले. त्यानंतर इनोव्हा वाहनातच श्री. पोतदार म्हणाले आपली पहिली भेट झाली होती, त्याच वेळेला विशय झाला होता, वन परसेंट व बिलींगचे दोन परसेंट त्यानंतर मी म्हणालो सर हे दोन दहा आणि बाकीचे आता इथ पर्यंत सर्व क्लोज, आपलं म्हणजे ते अडीच आणि हे दोन लाख दहा हजार, अडीच आणि दोन लाख दहा हजार किती झाले दोन दहा आणि अडीच, त्यावर श्री. पोतदार म्हणाले साडे चार झाले ना. त्यावेळी मी म्हणालो चार लाख साठ हजार झाले ना सर, बरोबरना त्यावर श्री. पोतदार म्हणाले हा टु परसेंट झाले आहे. तुम्ही वन परसेंट मध्ये वन परसेंट काट मारुनच दिलं तुम्ही असे बोलुन मी, लाचेच्या रक्कमेची पिशवी त्यांचे समोर धरली असता, लोकसेवक श्री. पोतदार यांनी सदरची लाचेच्या रक्कमेची पिशवी स्विकारली. त्यानंतर श्री.पोतदार यांनी मला विचारले, याचेत तुम्ही नाराज हे का, त्यावेळी मी, त्यांना नाही ओ सर, नाराज नाही काही, मोजुन घ्या बरं का सर, त्यावेळी श्री.पोतदार म्हणाले ओ साहेब माणुस मोठा राहतो का? मागच्या वेळी तुम्ही प्लास्टीक मध्ये रॅप केलेले दोन दिले होते त्याचेनंतर तुम्हीय ना एक पन्नासची गडडी अजुन वरुन दुसरी दिली असे म्हणाले.

त्यानंतर लगेच पंच श्री. राहुल घटी यांनी बोरगांव शिवारात सुरगाणा ते बोरगांव जाणारे रोडलगत आल्यानंतर व लोकसेवक श्री.पोतदार यांनी लाचेच्या रक्कमेची पिशवी स्विकारल्यानंतर वाहनाचे पार्किंग लाईट चालु करुन, गाडी थांबवुन लाच स्विकारले बाबतचा पूर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र सानप व त्यांचे सापळा पथकाने लोकसेवक श्री.पोतदार, गटविकास अधिकारी, सुरगाणा जि. नाशिक यांना लाचेच्या रक्कमेची पिशवी हातात असतांना पकडुन त्यांना ओळख देवुन त्यांचे नाव, पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. महेश गोकुळ पोतदार, वय 52 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद गटविकास अधिकारी, वर्ग 1, पंचायत समिती, सुरगाणा जि. नाशिक रा.विद्या हौसींग रो-हाउस नं. 15, राजमाता मंगल कार्यालयाजवळ, आरटीओ कॉर्नर, मेरी, दिंडोरी रोड, नाशिक

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

rahul babulal more(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
सुरगाणा पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): rahul babulal more
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI